महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १० जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा
# तुकडेबंदी कायदा रद्द - महसूलमंत्र्यांची घोषणा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची मोठी घोषणा महसूल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. या निर्णयाने राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. बावनकुळेंच्या घोषणेचं महाविकास आघाडीकडून स्वागत केलं आहे. या संदर्भात 15 दिवसात एसओपी केली जाणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार 1 जानेवारी 2025 पर्यंत जे तुकडे झाले, तुकडी बंद कायदा असल्याने व्यवहार करता येत नाही. तुकडे बंदी कायदा रद्द केला जाईल. एक एसओपी केली जाईल. महसूल, नगरविकास, जमाबंदी आयुक्त या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठित केली जाईल. ही समिती एसओपी करेल. सुमारे 50 लाख लोकांना फायदा होईल. या संदर्भातील 15 दिवसात सूचना असतील, तर कराव्यात असेही बावनकुळे यांनी आवाहन केलं आहे.

## महाविकास आघाडीकडूनही निर्णयाचे स्वागत

विजय वडेट्टीवार स्वागत करताना म्हणाले की, हा अतिशय मोठा निर्णय असून दलालांनी मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. यामध्ये काही लोकांनी आत्महत्याही केल्या आहेत. मात्र हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी महसूल मंत्र्यांनी केलेली घोषणा चांगली असल्याचे सांगितले. मी या निर्णयाचे स्वागत करत असून अनेक महसूलमंत्री झाले. मात्र त्यातील हा चांगला निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले.

गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध

दरम्यान, महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्रात तुकडेबंदी लागू आहे. म्हणजे काय तर तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. महाराष्ट्र सरकारच्या 12 जुलै 2021 च्या परिपत्रकानुसार, 1,2,3 अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध आले होते. या परिपत्रकाला विरोधही झाला होता. हे प्रकरण न्यायालयतही गेलं होतं. त्यानंतर 5 मे 2022 राज्य सरकारनं प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार, राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांमध्ये जिरायत जमिनीसाठी 20 गुंठे, तर बागायत जमिनीसाठी 10 गुंठे एवढं तुकड्याचं प्रमाणभूत क्षेत्र नमूद करण्यात आलं. बऱ्याचशा शेतकऱ्यांना विहिरीसाठी किंवा शेतरस्त्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव 1, 2, 3 गुठ्यांमध्ये जमिनी खरेदी किंवा विक्री करावी लागते. त्यामुळे या शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली होती. आता याच शेतकऱ्यांसाठी दिलासादायक गोष्ट आहे.




## भिवंडीतील गोदामांचे होणार सर्व्हेक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडीतील अनधिकृत गोदामांसह या गोदामातील साठविल्या जाणाऱ्या अनधिकृत केमिकल गोदामाला लागलेल्या आगी संदर्भात विधान परिषदेत आमदार निरंजन डावखरे यांनी प्रश्न उपस्थित केला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीएकडून या भागातील गोदामांचे हवाई सर्वेक्षण करून तपासणी करीत असतानाच परवानगी देणाऱ्या सरपंच ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर कारवाईचा इशारा दिला आहे. यामुळे पुन्हा एकदा या भागातील गोदामांचा प्रश्न चर्चेत आला आहे.

1980 च्या सुमारास तालुक्यातील राहनाळ, पूर्णा, काल्हेर या भागात सुरू झालेला गोदाम व्यवसाय पाहता पाहता संपूर्ण तालुका व्यापून बसला आणि आज भिवंडी तालुक्याचा ग्रामीण भाग हा लॉजिस्टिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला. साहजिकच या निमित्ताने या भागात मोठी आर्थिक सुबत्ता आली आणि त्या आर्थिक सुबत्तेमधूनच या भागात अनधिकृत बांधकाम करण्याचे प्रमाण सुद्धा तेवढेच वाढलेले आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात सुमारे 50 हजारहून अधिक गोदामे उभारण्यात आली आहेत. या भागात सुरुवातीला स्थानिक ग्रामपंचायत परवानगीने गोदाम बांधकाम होत असत. 2009 मध्ये या भागाच्या विकासाची जबाबदारी एमएमआरडीए प्राधिकरणाकडे सोपवली. साहजिकच एमएमआरडीएकडे बांधकाम परवानगीचे अधिकारी गेले. सुरुवातीला ग्रामपंचायतीच्या जुन्या तारखांवरील परवानगी दाखवून बांधकामे झाली. पण, आज ही मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या दुर्लक्षामुळे या भागातील अनधिकृत बांधकामे थोपविण्यात अपयशी ठरले आहे.

ग्रामीण भागात गोदाम असल्यास येथून संपूर्ण देशात मालाची ने आण करणे सहज शक्य असते. तर जेएनपीटी बंदर जवळ असल्याने आयात होणारा व निर्यात होणारा माल या ठिकाणी साठवणूक करण्याची गरज वाढल्याने येथील गोदाम व्यवसाय फोफावत गेला. पण, नियोजनाचा अभाव व अनधिकृत बांधकामांमुळे याभागात अनेक दुर्घटना, आगी लागण्याच्या घटना घडल्या आहेत.

## ठाण्यातील सैनिकी मुलांच्या वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी**

**ठाणे,दि.09 :** ठाणे येथे युध्द विधवा, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, माजी सैनिक व सेवारत सैनिकांच्या मुलांसाठी सर्वसोयींनी युक्त असे वसतिगृह, ज्ञानसाधना कॉलेज मागे, धर्मवीर नगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) या ठिकाणी कार्यरत आहे.

सैनिकी मुलांचे वसतीगृह ठाणे येथे शैक्षणिक वर्ष 2025-26 करिता इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर शिक्षण तसेच औद्योगिक प्रशिक्षण आणि तांत्रिक विद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या युध्दविधवा पाल्य, माजी सैनिक विधवा पाल्य, युध्दात जखमी झालेले माजी सैनिकांचे पाल्य, माजी सैनिक पाल्य व सेवारत सैनिक पाल्य यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल. प्रवेश पुस्तिका विक्री दि.01 जुलै 2025 पासून सैनिकी मुलांचे वसतिगृह, ठाणे येथे सुरु आहे.

सोमवार, दि.28 जुलै 2025, सांयकाळी 5 वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील. शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया बुधवार, दि.30 जुलै 2025 रोजी सैनिकी मुलांचे वसतिगृह, ठाणे येथे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. यावेळी अर्ज सादर कलेले विद्यार्थी/पालक यांनी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. अधिक माहितीकरिता सैनिकी मुलांचे वसतिगृह, ठाणे, मो. 9769664830, 9325307689, 9819786350 येथे संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर प्रांजळ जाधव (निवृत्त) यांनी कळविले आहे.

## चार महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर उल्हासनगर अतिरिक्त आयुक्तपदी धीरज चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - तीन वर्षे उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध योजनांना, विकासकामांना दिशा देण्याचा प्रयत्न केल्यावर चार महिन्यांपूर्वी बदली झालेले अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या जागी चार महिन्याच्या प्रतीक्षेनंतर प्रतिनियुक्तीवर धीरज चव्हाण यांची अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती करण्यात आली आहे. चव्हाण यांच्या आगमनाने पहिल्यांदाच महानगरपालिकेत



प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची नवी टीम सक्रिय झाली आहे. धीरज चव्हाण हे पदोन्नतीवर आले असून ते याआधी उपमुख्यमंत्री कार्यालयात विशेष कार्य अधिकारी तसेच अंबरनाथ नगरपालिकेत उप मुख्याधिकारी देखील होते. पूर्वी महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर महाराष्ट्र शासनाचे बोटावर मोजण्याइतपत अधिकारी असायचे. आता मात्र अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, धीरज चव्हाण, उपायुक्त। विशाखा मोटघरे, अनंत जवादवार, दिपाली चौगले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता निलेश शिरसाठे, सहायक आयुक्त अजय साबळे, सुनील लोंढे, मयुरी कदम ही प्रतिनियुक्तीवरील नवी टीम आलेली आहे.

## प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** एक नोव्हेंबर २००५ पासून नियुक्त सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करा, चार कामगार संहिता तात्काळ रद्द करा, पीएफ आरडीए कायदा रद्द करा या प्रमुख मागण्यांसाठी देशातील प्रमुख अकरा संघटनांनी पुकारलेल्या देशव्यापी संपास सक्रिय पाठिंबा देण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर जिल्हा परिषद कर्मचारी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे हल्लाबोल आंदोलन करत जोरदार निदर्शने केली. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शासनाने जुनी पेन्शन, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व इतर आर्थिक व सेवा विषयक प्रश्नां बाबत अनेक आश्वासने देण्यात आले होते. याबाबत ठोस निर्णय घेऊन सकारात्मक कार्यवाही झाली नसल्याने कामगारांमध्ये नाराजी पसली आहे. आजच्या हल्लाबोल आंदोलनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. दरम्यान, मागण्यांची सोडवणूक न केल्यास सप्टेंबर महिन्यामध्ये संपाचा इशाराही कामगार संघटनेकडून देण्यात आला आहे. यावेळी सहभागी संघटनांनी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस भास्कर गव्हाळे यांच्या नेतृत्वाखाली शिस्तमंडळाने आपल्या मागण्यांची सनद निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांच्यामार्फत वापर मुख्यमंत्र्यांना सादर केली.




## महावितरण खाजगीकरणाविरोधात कॉंग्रेसचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : खाजगी कंपनी या नफेखोरी करण्याच्या उद्देशाने या क्षेत्रात उतरत असल्याने भविष्यात गरीब जनतेला याचा भुर्दंड सोसावा लागेल. प्रशासन महावितरणच्या खाजगीकरणाबाबत घेत असलेल्या निर्णयाला तसेच वीज ग्राहकांसाठी स्मार्ट तथा प्रीपेड मीटर बसविण्यास नागरिकांचा विरोध असल्याने हे निर्णय रद्द करावे, या मागणीसाठी ठाणे काँग्रेसच्यावतीने बुधवारी महावितरणच्या वागले येथील मुख्य कार्यालयासमोर निषेध आंदोलन केले. यावेळी वीज कंपनी जनतेच्या मालकीची नाही कुणाच्या बापाची, अदानी हटाव देश बचाव अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

भिवंडी, कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात सेवा देणाऱ्या टोरंट आणि अदानी या खाजगी वीज कंपन्या विरोधात ग्राहकांमध्ये प्रचंड रोष असताना ठाणे, नवी मुंबई, पनवेल आदी भागात सार्वजनिक वीज वितरणासाठी अदानी कंपनी पुढे आलेली आहे. हा वीज वितरणाच्या खाजगीकरणाकडे जाणारा मार्ग असल्याने नागरिक याच्या विरोधात आहेत. भिवंडी, कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात सेवा देणाऱ्या टोरंट आणि अदानी या खाजगी वीज कंपन्या विरोधात ग्राहकांमध्ये प्रचंड रोष असताना ठाणे, नवी मुंबई, पनवेल आदी भागात सार्वजनिक वीज वितरणासाठी अदानी कंपनी पुढे आलेली आहे. हा वीज वितरणाच्या खाजगीकरणाकडे जाणारा मार्ग असल्याने नागरिक याच्या विरोधात आहेत.

या क्षेत्रात काही ठराविक भांडवलदार कंपन्यांना प्रवेश दिल्याने घरगुती वापर करणाऱ्या ग्राहकांवरती वाढीव बोजा पड शकतो. त्यामुळे अदानी इलेक्ट्रिकल कंपनीस वितरणाचा परवाना देऊ नये, राज्य सरकारने वीज कंपनीचे खाजगीकरणाचे धोरण रद्द करावे, स्मार्ट व प्रीपेड मीटर बसवण्यात येऊ नये, अशा मागण्याचे निवेदन महावितरणचे अधिक्षक अभियंता मेश्राम यांना ठाणे कोंग्रेसच्यावतीने देण्यात आले.

वीज ही जनतेच्या हक्काची असून महावितरण ही सरकारी कंपनी असल्याने ती लोकांच्या अधिकाराखाली येते, पण खाजगीकरणानंतर ती लोकांच्या नियंत्रणातून बाहेर जाईल. काही उद्योग समुहांना फायदा मिळावा यासाठी खाजगीकरण केले जात असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी केला.

## डोंबिवलीत प्रथमच महापालिका आयुक्तांचा जनता दरबार

### आयुक्तांच्या थेट भेटीने नागरीकांनी व्यक्त केले समाधान !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिका क्षेत्रातील नागरीकांच्या समस्यांचे जलद गतीने निराकरण व्हावे, या दृष्टीकोनातून दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी महापालिकेच्या मुख्यालयातील आयुक्त दालनात जनता दरबाराचे आयोजन करण्यात येते. आता डोंबिवलीतील नागरीकांना विशेषत: ज्येष्ठ नागरीकांना देखील जनता दरबारात समक्ष उपस्थित राहून आपल्या समस्या आयुक्तांसमोर मांडता याव्यात यासाठी प्रथमच आयुक्तांच्या जनता दरबाराचे आयोजन डोंबिवली (पूर्व) येथील पीपी चेंबर येथे फ प्रभाग कार्यालयाच्या इमारतीत काल दुपारी करण्यात आले होते. यावेळी सुमारे 75 ते 80 नागरीकांनी जनता दरबारास उपस्थित राहून आपल्या समस्या आयुक्त व अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. सदर समस्यांवर चर्चा करुन त्यांचे त्वरीत निराकरण करण्याबाबतचे निर्देश आयुक्तांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना सक्त सुचना देण्यात आल्या असून असे बांधकाम होताना दिसले तर त्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश आपण दिले आहेत, महापालिका रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्र यांच्यामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील असून केंद्र शासनाच्या "नॅशनल कॉलिटी अशुरन्स स्टँडर्ड" व "कायाकल्प" या प्रकल्पा अंतर्गत/सेवांतर्गत नागरी आरोग्य केंद्रे व महापालिका रुग्णालये यांच्या कार्यप्रणालीबाबत कालबध्द नियोजन करण्यात येत आहे आणि येत्या कालावधीत अधिक दर्जेदार सुविधा देण्याचा आपण प्रयत्न करु अशी माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी योवळी पत्रकारांशी बोलताना दिली. जनता दरबार संपन्न झाल्यानंतर आयुक्त अभिनव गोयल यांनी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे तसेच इतर अधिकाऱ्यांसमवेत थेट चालत डोंबिवली स्थानक परिसराची पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना दिल्या.











निलेश सांबरेंच्या नेतृत्वाखाली
## शहापुरातील जिजाऊचे पदाधिकारी शिंदेसेनेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर, ता.9 (वार्ताहर)

शहापूर तालुक्यातील आगामी जिप व पंस निवडणूकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत जिजाऊ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा जिल्हाप्रमुख मारुती ढिर्डे व जिजाऊचे सर्वेसर्वा निलेश सांबरे यांच्या नेतृत्वाखाली दिवसेंदिवस रोज प्रवेश होत असल्याने शिंदेच्या शिवसेनेची ताकद वाढत आहे. याच पार्श्वभूमीवरजिजाऊ संघटनेकडून 2024 ला विधानसभा निवडणुकीत इच्छुक असलेले उमेदवार व निवडणूक लढवलेले उमेदवार यांनी शिवसेना पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे येथे नुकताच प्रवेश केला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत जिजाऊ संघटनेकडून शहापूर विधानसभेत तब्बल ४३ हजार मते मिळवलेल्या रंजना उघडा, सारंगपुरी ग्रामपंचायतचे सरपंच नारायण दरोडा, जिजाऊचे खर्डी विभाग प्रमुख व धामणी चे माजी सरपंच अशोक वीर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक तथा मलेगावचे सरपंच कालुराम उघडा हे सर्व विधानसभा निवडणुक लढविण्यास इच्छुक होते व यांनी उमेदवारी अर्जही भरला होता पण अर्ज मागे घेण्यात आला होता. धामणी ग्रामपंचायतच्या सरपंच सुगंधा वीर, समाधान साडे, रफिक शेख यांनी आज शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते व निलेश सांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना या पक्षात जाहीर प्रवेश केला, यावेळी जिल्हाप्रमुख मारुती धीरडे, जिजाउचे हरेश पष्टे व आदी पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांच्या प्रवेशाने शहापूर तालुका शिंदे शिवसेना पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढल्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत यांचा फायदा शिवसेना या पक्षाला नक्कीच होणार आहे. आगामी जिप व पंस निवडणुकीत जिजाऊतून शिवसेनेत प्रवेश घेतलेल्या ह्या उमेदवारांची जिप निवडणुकीत नक्कीच वर्णी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## गीतासार



### अध्याय १६
### दैवासुरसम्पद्विभागयोगः


श्रीभगवानुवाच अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः । दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १६-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, भयाचा संपूर्ण अभाव, अंतःकरणाची पूर्ण निर्मलता, तत्त्वज्ञानाकरता ध्यानयोगात निरंतर दृढ स्थिती आणि सात्त्विक दान, इंद्रियांचे दमन, भगवान, देवता आणि गुरुजनांची पूजा, तसेच अग्निहोत्र इत्यादी उत्तम कर्मांचे आचरण, त्याचप्रमाणे वेदशास्त्रांचे पठन-पाठन, भगवंतांच्या नामांचे व गुणांचे कीर्तन, स्वधर्माचे पालन करण्यासाठी कष्ट सोसणे आणि शरीर व इंद्रियांसह अंतःकरणाची सरलता ॥ १६-१ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् । दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ १६-२ ॥

काया-वाचा-मनाने कोणालाही कोणत्याही प्रकाराने दुःख न देणे, यथार्थ व प्रिय भाषण, आपल्यावर अपकार करणाऱ्यावरही न रागावणे, कर्मांच्या ठिकाणी कर्तेपणाच्या अभिमानाचा त्याग, अंतःकरणात चंचलता नसणे, कोणाचीही निंदा वगैरे न करणे, सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी निर्हेतुक दया, इंद्रियांचा विषयांशी संयोग झाला तरी त्यांच्याविषयी आसक्ती न वाटणे, कोमलता, लोकविरुद्ध व शास्त्रविरुद्ध आचरण करण्याची लज्जा, निरर्थक हालचाली न करणे ॥ १६-२ ॥

# गुरुने दिला ज्ञानरूपी वसा



लेखक
शारदासुत सुनील म्हसकर



गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥

गुरू हा ब्रह्मा (सृष्टीचा निर्माता), गुरू विष्णू (सृष्टीचा कर्ता), गुरु महेश (सृष्टीचा नाश करणारा) आणि गुरू हा परम ब्रह्म आहे, त्या गुरूंना मी नमन करतो.

आज गुरुपौर्णिमा ! आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जातात. महाभारत हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. महर्षी व्यासांनी वेदाचे चार भाग, सहा शास्त्रे, अठरा पुराणांच्या रचना करून मानवी जीवनाला संपन्न केले. असे मानले जाते की, गुरुपौर्णिमेच्या या पवित्र दिवशी शिव म्हणजे आदियोगी यांनी प्रथमच त्यांचे शिष्य सप्तर्षींमध्ये योग विज्ञान संक्रमित केले. आणि या दिवशी आदियोगी हे आदि गुरु अर्थात प्रथम गुरु बनले. सप्तर्षींनी या ज्ञानाचा जगभर प्रसार केला.

व्यासांनी आणि सप्तर्षींनी मनुष्याला जीवन जगण्याचे खरे मार्गदर्शन केले आहे. या अनमोल कार्याची कृतज्ञता म्हणून आपण दरवर्षी 'व्यास पौर्णिमा' अथवा "गुरुपौर्णिमा' साजरी करतो. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा तसेच जे गुरु शिष्याला ज्ञान देतात, तो ज्ञानाचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचावा, म्हणून गुरूंचे समरण करण्याचा त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे.

रामायण-महाभारत काळापासूनच नव्हे तर प्राचीन काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. व्यास व गणेश, जनक व याज्ञवल्क्य, शुक्राचार्य व जनक, कृष्ण-सुदामा व सांदिपनी, विश्वामित्र व राम-लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन, वशिष्ठ व राम-कृष्ण, मच्छिंद्रनाथ व गोरक्षनाथ, निवृत्तीनाथ व ज्ञानदेव, जनार्दन स्वामी व एकनाथ, अशी अनेक गुरु-शिष्यांची परंपरा आहे. भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी वडीलबंधू निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले आणि निवृत्तीनाथ ह्यांच्या गुरूकृपेतूनच ज्ञानदेवांच्या हातून ज्ञानेश्वरीचे लेखनकार्य घडले!

आपल्या जीवनात गुरूंचे महत्व अनन्यसाधारण आहे.

गुरु हा संतकुळीचा राजा । गुरु हा प्राणविसांवा माझा ।
गुरुवीण देव दुजा । पाहातां नाहीं त्रिलोकीं ॥

अशी गुरूंची महती संत ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथात गायली आहे. ऐहिक वादळांवर मात करून यशस्वी जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा गुरू. गुरू आपल्याला आपल्या व्यक्तिमत्वाच्या अनंत शक्यतांच्या दारापर्यंत घेऊन जातो. गुरू हा असा आहे की ज्याच्यात सामान्य माणसाचे विशाल व असामान्य व्यक्तिमत्त्वात रूपांतर करण्याची क्षमता असते. मानवी जीवनाची सार्थकता अधोरेखित करताना बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे –

"ओम पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात पूर्णमुच्यते.
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवाशिष्यते ॥

या परिपूर्णतेची अनुभूती गुरूशिवाय शक्य नाही. गुरु म्हणजे असा सत् चित् आनंद आहे जो आपल्याला आपली खरी ओळख करून देतो.

गुकारस्त्वन्धकारस्तु रुकार स्तेज उच्यते।
अन्धकार निरोधत्वात् गुरुरित्यभिधीयते॥

'गु' म्हणजे अंधार, आणि 'रु' म्हणजे तेज. अशाप्रकारे अंधारापासून रोखून तेजस्वी प्रकाशाकडे वाटचाल करणारा गुरु असतो. गुरु एक तेज आहे. गुरूंचे एकदा आगमन झाले की मनातील संशयरूपी अंधःकार कुठल्याकुठे पळून जातो. गुरु साधकाचे अज्ञान दूर करतो आणि त्याच्या आत असलेला निर्मितीचा स्त्रोत अनुभवण्याची क्षमता निर्माण करतो.

पण, तरीही मनात प्रश्न राहतोच की, गुरु कोणाला म्हणावे? तर या प्रश्नाचे उत्तर आपल्याला खालील श्लोकातून मिळते...

प्रेरकः सूचकश्चैव वाचको दर्शकस्तथा।
शिक्षको बोधकश्चैव षडेते गुरवः स्मृताः॥

या श्लोकानुसार, जो प्रेरणा देतो, माहिती देतो, सत्य सांगतो, मार्ग दाखवतो, शिकवतो आणि प्रबोधन करतो, हे सर्व गुरु समान आहेत.

संसाररूपी सागरात दीपस्तंभ बनून योग्य मार्गदर्शन करणारे व जीवन जगण्याची श्रेष्ठ कला शिकवून आपल्या शिष्याचा सर्वांगीण विकास करणारे सदपुरुष म्हणजेच गुरु.

गुरौ ना प्राप्यते यत्तन्नान्यत्रापि हि लभ्यते।
गुरु प्रसादात सर्व प्रप्नोत्येव न संशयः ॥

गुरूंच्या कृपेने माणूस काहीही, म्हणजे सर्व काही साध्य करू शकतो, यात शंका नाही. पण गुरूकडून जे मिळत नाही ते कुठेही मिळू शकत नाही. गुरु कुबेराचा अक्षय्य खजिनाच आहे आणि त्या खजिन्याचे मोल होऊच शकत नाही. अज्ञानाच्या अंधारात बंद केलेले आपले डोळे ज्ञानाच्या किरणांनी ते उघडणाऱ्या गुरूला आपण नेहमीच नमन केले पाहिजे. म्हणूनच म्हणतात,

अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।।

असे खरे नमन करणाऱ्या विद्यार्थी,शिष्य, साधक, उपासक, अभ्यासक ह्यांच्यावर गुरू आशिषामधून गुरूतत्त्व कृपा वर्षाव करत असते.त्या कृपाबळावरच शिष्य मोठे कार्य करू शकतो. गुरु म्हणजे असे ज्ञान की ज्याची प्राप्ती झाल्याबरोबर मनातील भयाची सगळी भावनाच लोप पावते. मग कुणाचीही भीती वाटत नाही. मग आपण सहजपणे म्हणतो ,

सद्गुरू सारीखा असता पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ॥

आपल्या जीवनात गुरूंची नानाविध रूपे आपणास पहावयास मिळतात. बालक गर्भात असल्यापासून आई त्याच्यावर उत्तम संस्कार करते. आई आपली पहिली गुरु असते. निसर्गातील प्रत्येक घटक आपले गुरु असतात, कारण निसर्गाकडून खूप चांगल्या गोष्टी आपल्याला सदैव शिकायला मिळतात. जसे पाणी, झाडे, वेली, पाने, फुले, पशू, पक्षी, समुद्र, नदी इत्यादी. पुस्तके, मित्र व मैत्रिणी हे सुद्धा आपले गुरूच असतात. जे जे लोक आपल्याला जगण्यासाठी नेहमी संस्कार व प्रेरणा देतात ते गुरूच असतात.

अवधूतांनी यदुराजाला उपदेश करताना सांगितले की -

"जो जो जयाचा घेतला गुण । तो म्यां गुरु केला जाण ।
गुरुसी पडले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ॥"

असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले. या चोविसांचे महत्व तीन प्रकारांत आहे. एक सदगुण अंगीकारासाठी गुरू, दोन अवगुण त्यागासाठी गुरु आणि तीन ज्ञानप्राप्तीसाठी गुरु. म्हणजे 'गुरु' हे लौकिक दृष्टीने जे मार्गदर्शन करतात ते या विभागात येतील.

ज्याप्रमाणे डोळ्यांत अंजन घातले असता दृष्टीचे तेज वाढते त्या दृष्टीने भूमिगत धन दिसू लागते. ज्याप्रमाणे हाती चिंतामणी लागल्यास मनुष्याचे सदासर्वदा मनोरथ पूर्ण होतात. त्याप्रमाणे गुरू असतो.

शाळेतील दैनंदिन जीवनात योग्य आणि अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये गुरुच निर्माण करतो. जीवनातील आव्हानांचा सामना करताना योग्य निर्णय घेण्यासाठी, गुरुजी आपल्या विद्यार्थ्यांना या दोघांमधील फरक कसा करावा हे शिकवतात. जीवनातील प्रत्येक आव्हानात्मक समस्येला विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि धैर्याने तोंड देता आले पाहिजे, हे गुरुच सतत सांगत असतो. गुरूंच्या अविरत शिकवणी आणि आशीर्वादामुळेच विद्यार्थी आव्हानात्मक जीवन परिस्थितीतून मार्ग काढू शकतात. गुरुच विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना धीर धरण्यास सांगतात. गुरू विद्यार्थ्यांना कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी, त्यांच्यामध्ये एक मजबूत मानसिक बळ विकसित करतात.

कुंभार ज्या प्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देऊन मडके बनवतो. त्याचप्रमाणे गुरु सजीव मानव रुपी व्यक्तिमत्त्वाला आपल्या संस्कारांनी आदर्श घडवतात. गुरूचा महिमा मोठा आहे. सामान्य माणसाचे रूपांतर महान व्यक्तिमत्वात करणारा गुरुच असतो. संभ्रमात पार करण्याच्या युक्त्या शिकवून यशस्वी आणि सन्माननीय जीवन जगण्याचा मार्गही तोच दाखवतो. म्हणून आपण आपल्या सर्व क्षेत्रातील सर्व प्रकारच्या गुरूंचा म्हणजे शिक्षकांचा आदर केला पाहिजे. गुरूचे ज्ञान सागराप्रमाणे अथांग आहे. आपण गुरूंपुढे नम्र होऊन ज्ञान कण वेचले पाहिजेत.

'गुरु बिन ज्ञान कहासे लावू?' हेच खरे आहे.

गुरु म्हणजे केवळ अमृतच. ह्या अमृताच्या सेवनाने तहान कायमची आणि पूर्णपणे शमते.

आजच्या या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपण आगामी वर्षातील नवनवे संकल्प करावेत. गुरुंच्या मार्गदर्शनाखाली आपल्या मार्गात येणारे अडथळे आपण दूर करुन आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करण्याचा निश्चय करावा.

खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जी शिकवण दिली आहे, जे संस्कार केले आहेत, या सर्वांचे प्रत्यक्ष आचरण करणे होय. म्हणूनच,

नमोस्तु गुरुवे तस्मै, इष्टदेव स्वरूपिणे।
यस्य वाग्मृतम् हन्ति,विषं संसार संज्ञकम् ॥

ज्यांच्या अमृतमय वाणीने अज्ञानरूपी सांसारिक विषाचा नाश होतो त्या महान ईश्वरसदृश गुरूला मी विनम्र अभिवादन करतो.

आपण मिळविलेले ते ज्ञान आपण आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहचविणे ही एक आपली नैतिक जबाबदारी असते.

याकरिता, आपण मनात निरंतर
गुरुने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा
ही कृतज्ञतेची भावना ठेवून भविष्यात मार्गक्रमण करावे.

# अखेरची घटका मोजणाऱ्या पोलिस वसाहतीला निधी द्यावा

**- हरिष बेकावडे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण येथील पोलीस वसाहत फणस डोंगरी येथे असून जवळपास चार इमारती दोन बैठ्या चाळी यांची अक्षरशः उकिरड्यासारखी अवस्था झालेली आहे.अत्यंत अस्ताव्यस्त जागा असतानासुद्धा गेले कित्येक वर्षापासून निधी उपलब्ध नसल्याने तेथे जंगल निर्माण झाले आहे.

जवळपास 35 वर्ष जुन्या इमारती व चाळी असून शासन याकडे दुर्लक्ष करत आहे हे दुर्दैव आहे. त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसरात त्याच्यामुळे विषारी जनावरांची वावर सुरू झाला आहे .यातून घटना घडल्या जबाबदार कोण ?याचाही शासनाने विचार करावा.कायदा सुव्यवस्था त्याचबरोबर शांतता अबाधित राखण्याचे काम दिवसरात्र पोलीस कर्मचारी करत असतात. मात्र पोलीस ठाणे पेण ,वडखळ व जवळच्या ठाण्यातील पोलिसांना राहण्याची अत्यंत गैरसोय आहे. त्यामुळे त्यांना भाड्यापोटी आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

सन 2019 पासून यासाठी सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे सातत्याने प्रयत्न करून असून 2021 ला सदरच्या नादुरुस्त इमारती व चाळी पाडण्याचे पत्र बांधकाम विभागाने दिलेले आहे. मात्र अद्याप निधी अभावी काम थांबले आहे. विशेष म्हणजे पेण पोलीस स्टेशनचे कार्यालय ज्या ठिकाणी आहे तेथे तहसील कार्यालय, वनविभाग कार्यालय व अन्य कार्यालये असून बाजारपेठे लगत असल्याने वाहतुकीची कोंडी पूर्ण दिवसभर सातत्याने जाणवते यावर उपाय म्हणून शासनाने तहसील कार्यालय हे प्रांत कार्यालयाच्या प्रशस्त जागेत दिल्यास लोकांची कामांची गैरसोय होणार नाही. त्याचबरोबर वाहतुकीची समस्या सुटेल. तसेच पोलीस ठाणे कार्यालयासाठी त्याच ठिकाणी जागा उपलब्ध होईल याचाही विचार करावा .अन्यथा पेण पोलीस वसाहतीच्या जागेत फणस डोंगरी येथे शक्य झाले तर पोलीस स्टेशनचे कार्यालयाची व्यवस्था केल्यास वाहतुकीची समस्या सुटू शकेल.शिवाय जवळच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय असल्याने कामे सुरळीत होतील. तरी अखेरची घटका मोजत असलेल्या पोलिसांना राहण्यासाठी घरे मिळण्यासाठी शासनाने तात्काळ निधी मंजूर करावा यासाठी रायगडच्या दोन्ही मंत्र्यांनी लक्ष घालावे.याबाबत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांना तात्काळ पत्र देणार असून रायगडच्या कर्तव्यदक्ष आयपीएस दर्जाच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी याबाबत दखल घेतली असून लवकरच प्रस्ताव शासनाकडे सादर करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांना संदेश द्वारे दिली आहे.

# छताचा प्लास्टर कोसळून २ महिलांसह एक मुलगा जखमी..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : भिवंडी शहरातील शांतीनगर - पिरानी पाडा परिसरात बुधवारी एका धोकादायक अवस्थेतील इमारतीचा छताचा प्लास्टर अचानक कोसळल्याने मोठा अपघात झाला असुन झालेल्या या घटनेत दोन महिलांसह एक मुलगा गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ उपचारासाठी भिवंडीतील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन याबाबत नोंद घेतली आहे.

समद हरून अन्सारी (वय १०)
मरियम मिरजुद्दीन गोसे (वय २७)
व शारीना परवीन (वय २९ )असे जखमी व्यक्तींची नावे आहेत.

याबाबत सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की पालिका प्रभाग समिती क्रमांक 2 मधील पिराणी पाडा येथील बिहारी चाळ घर क्रमांक ३९०/१ ही एकमजली मिळकत जीर्ण अवस्थेत असून या इमारती मधील एक घरातील छताच्या स्लॅबचे प्लास्टर सकाळी कोसळले. ही घरातील व्यक्तींवर पडल्याने त्यामध्ये घरातील दोन महिला व एक मुलगा जखमी झाला आहे.या इमारती मध्ये आठ कुटुंब राहत असून घटनेची माहिती मिळताच पालिकेचे.प्रभागा सहाय्यक आयुक्त माणिक जाधव व आपत्कालीन कक्षातील कर्मचारी पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत मदत कार्य सुरू केले या घटनेतील जखमींना स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत असल्याने समद व मरियम या दोघांना पुढील उपचारासाठी ठाणे जिल्हा रुग्णालयात रवाना केले आहे.संपूर्ण इमारतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडित करून कुटुंबियांना इमारत रिकामी केली आहे.

भिवंडीतील धोकादायक व अनधिकृत इमारतींचा प्रश्न गंभीर असून महापालिका प्रशासनाने कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# जीवघेण्या खड्यांचा वाली कोण?

## नढई मंदिरा पाठीमागे पडलेले जिवघेणे खड्डे धोकादायक

### राष्ट्रीय महामार्ग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड -माळशेज -अहिल्या नगर या राष्ट्रीय महामार्गावर नढई मंदिराच्या पाठीमागे व नढई - नारिवलि कडे वळण घेऊन जाणार्या रस्त्यावर भले मोठे खड्डे पडले आहेत. गेले अनेक दिवस हे खड्डे असेच असून राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी किंवा मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकार्यांना दिसत नाही का असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. संबधित दोन्ही विभाग याकडे दुर्लक्ष असून एखाद्या मोठा अपघात होऊन जिव जाण्याची वाट प्रशासन बघत आहे का असा प्रश्न भुवन, दहिगाव, शेलारि, म्हाडस, बांधिवली, नारिवरि या भागातील प्रवासी, नागरिक करत आहेत. या भागातील नागरिकांना प्रवासासाठी एकमेव हाच मार्ग असून रोज शेकडो मोटार सायकल व इतर वाहने या रस्त्यावर ये जा करत असतात.

या रस्त्यावर म्हाडस येथून स्टोन क्रशर मधून रोज शेकडो डंपर ओहरलोड भरून खडिचि वाहतूक चालू आहे. त्यामुळे या पुर्ण रस्त्याची वाताहात झालि आहे. आर.टि.ओ.अधिकार्यांचे आर्थिक साटे लोटे असल्याने दुर्लक्ष करित असल्याने दिवसा उजेडात ओहरलोड वाहतूक होत असताना कोणतिही कारवाई होताना दिसत नाही.

दरम्यान संबधित प्रशासनाने मंदिरा पाठीमागे पडलेले खड्डे त्वरित भरले नाहीत तर या खड्यात बसून आंदोलन करणार असल्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# वन महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारत देशात १ ते ७ जुलै या सप्ताहात वन महोत्सव साजरा केला जातो. सन १९५० पासून हा सप्ताह सुरू झाला या कालावधीत तत्कालीन मंत्रीगण व मान्यवरांकडून संपूर्ण देशात वृक्षारोपण करण्यात आले. जुलै महिन्यात बऱ्यापैकी पावसाची सुरवात झालेली असते त्यामुळे वृक्षारोपण करण्यासाठी हा योग्य कालावधी आहे.

कल्याण वनविभाग अंतर्गत, दहागाव परिमंडळचे वनपाल मुरलीधर जागकर, वनरक्षक सुशांत निकम, मोहिनी शेळके, विशाल कंथारिया, सुहास पवार, निखिल कांबळे, संतोष पंडागळे, रेहान मोतीवाला या वन्यजीव मित्रांच्या मदतीने तसेच रायते गाव जिल्हा परिषद तथा शिक्षण समिती सदस्य हरेश पवार, जिल्हा परिषद शाळा रायते मुख्याध्यापिका चारू बोंडे, इतर शिक्षक वृंद, संयुक्त वन व्यवस्थापन समिति अध्यक्ष नवगावं दिलीप टेंभे आणि जि. प. शाळा नवगावं, मुख्याध्यापक मगर यांच्या सोबतीने शाळकरी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्याचे राज्यचिन्ह, स्थानिक वन्यजीवांची ओळख आणि पर्यावरणातील त्यांचे महत्व सांगण्यात आले. तसेच रायते शाळेमधील विद्यार्थीगण आणि शिक्षकांकडून शाळेच्या आवारात वृक्षरोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्हाला काही मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. आज तुम्हाला आर्थिक लाभाची संधी मिळेल. तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**वृषभ**
वैवाहिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. आज तुम्हाला सर्व त्रासांपासून आराम मिळेल.तुम्हाला नातेवाईकाला दिलेले पैसे परत मिळतील.

**मिथुन**
नियोजित कामात उपयोग होईल. मीडिया क्षेत्राशी संबंधित लोकांना आज चांगला फायदा होईल. प्रमोशनशी संबंधित चांगली बातमी मिळू शकते.

**कर्क**
तुम्हाला मुलांकडून आनंद वाटेल.स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आज थोडी मेहनत करावी लागेल, यश मिळण्याची शक्यता आहे,

**सिंह**
तुम्ही आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्येबाबत चांगल्या डॉक्टरांशी संपर्क साधाल.विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीचे चांगले फळ मिळेल.

**कन्या**
वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. धार्मिक कार्यात उत्साहाने सहभागी व्हाल. धार्मिक विधीत सहभागी होण्याची संधी मिळू शकते.

**तूळ**
आर्थिक स्थिती मजबूत होईल.तुम्हाला तुमच्या कार्यक्षेत्रात यश मिळेल, अडथळ्यांनी भरलेली कामे पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय वाढेल.

**वृश्चिक**
तुमचे कुटुंबीय काही कामासाठी तुमची प्रशंसा करतील. विद्यार्थ्यांची अभ्यासात आवड वाढेल. तुमच्या नोकरीत काही सकारात्मक बदल होतील.

**धनु**
तुम्ही कोणाकडून घेतलेले कर्ज परत कराल.तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल, तुमची आधीच सुरू असलेली EMI आज पूर्ण होईल.


**मकर**
फॅशन डिझायनर्ससाठी आजचा दिवस चांगला राहील. वैवाहिक जीवनात मधुरता वाढेल. तुमच्या कौटुंबिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक अनुकूल होईल.तुम्हाला

**कुंभ**
मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. तुमचे शौर्य वाढेल. आज एखाद्या कामात तुमचे प्रयत्न यशस्वी होतील, तुमचे मन प्रसन्न राहील.

**मीन**
मित्र तुमचे मनोबल वाढवतील.वाहन खरेदी करण्याची संधी मिळू शकते. कौटुंबिक नात्यात चांगला समन्वय राहील. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

## रेसिपी

### बटाटा मखाना भाजी



साहित्य-
मखाना -एक कप
उकडलेले बटाटे-दोन
तूप किंवा उपवासाचे तेल-दोन टेबलस्पून
हिरव्या मिरच्या
जिरे-अर्धा टीस्पून
रॉक मीठ
काळी मिरी पावडर-१/४ टीस्पून
लिंबाचा रस
कोथिंबीर

कृती-
सर्वात आधी एका पॅनमध्ये १ चमचा तूप घाला, त्यात मखाने घाला आणि मंद आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. व बाजूला काढून ठेवा. आता त्याच पॅनमध्ये आणखी थोडे तूप घाला. त्यात जिरे घाला, नंतर हिरव्या मिरच्या घाला. उकडलेले आणि चिरलेले बटाटे घाला आणि २-३ मिनिटे हलके परतावा. आता रॉक मीठ आणि थोडी काळी मिरी पावडर घाला. सर्वकाही चांगले मिसळा. आता भाजलेले मखाने घाला आणि १-२ मिनिटे चांगले मिसळा जेणेकरून मसाले भाजीला लागतील. आता वरून कोथिंबीर घाला व लिंबाचा रस घालावा. तर चला तयार आहे उपवासाची बटाटा मखाना भाजी रेसिपी, गरम नक्कीच सर्व्ह करा.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅगझिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५१३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मूल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
Admission Open 2025-2026
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558





# स्वबळावर महापालिका लढणार ?
## - पृथ्वीराज चव्हाणांचे संकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**मुंबई :** "काँग्रेस पक्षाची भूमिका अशी आहे की आमची युती आमच्या इंडिया अलायन्समधील सहकारी पक्षांसोबत आहे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्ष.) जर त्यांना इतर कोणत्याही पक्षासोबत, समविचारी पक्षासोबत उप-युती करायची असेल तर ती त्यांची बाब आहे." असे पृथ्वीराज चव्हाण यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे.

याशिवाय पृथ्वीराज चव्हाण यांनी अप्रत्यक्षपणे राज ठाकरेंकडे इशारा करत म्हटले की, "जर आघाडीतील भागीदारांना काँग्रेसच्या विचारसरणीला, धर्मनिरपेक्षतेच्या विचारसरणीला आणि आंबेडकरांनी संविधानात लिहिलेल्या विचारसरणीला मूलभूतपणे विरोध करणाऱ्या लोकांशी युती करायची असेल तर आम्ही ते स्वीकारणार नाही." ते म्हणाले की, यापूर्वीही आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढवल्या आहेत आणि काँग्रेस पक्ष निवडणूक समितीने जर मुंबई, पुणे, नागपूर येथील निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्यास मला आश्चर्य वाटणार नाही. सुमारे २० वर्षांनंतर ५ जुलै रोजी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकाच मंचावर दिसले होते. या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे दोन्ही भावांसोबत दिसल्या, परंतु काँग्रेस पक्ष या कार्यक्रमापासून दूर राहिल्याचे दिसून आला. काँग्रेस आणि मनसेमध्ये बराच वादही आहे. याशिवाय, मंगळवारी काँग्रेसचे कार्यकर्ते मनसेच्या मोर्चापासूनही अलिप्त राहिल्याचे दिसून आले. मात्र याममध्ये मनसेसोबत शिवसेना उद्ध बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते दिसून आले. आतापर्यंत मविआच्या तिन्ही पक्षांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्रित लढवलेल्या आहेत. परंतु, आता राज ठाकरे यांच्या प्रवेशामुळे मविआच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याचे दिसत आहे.

### ठाकरे बंधूंच्या एकीकरणावरून काँग्रेसमध्ये अस्वस्थता

# ऐरोली रेल्वेस्थानकात लाखो प्रवाशांची कुचंबणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. ९ (बातमीदार)** ट्रान्सहार्बर मार्गावरील प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या ऐरोली रेल्वेस्थानकात दररोज लाखो प्रवाशांची वर्दळ असते. स्थानकाच्या पूर्वेला आयटी पार्क असून मुंबई तसेच उपनगरामधील नागरिक मोठ्या संख्येने कामासाठी येतात; मात्र पावसाळ्यात गळके स्थानक, अपुरी आसनव्यवस्था, स्वच्छतागृहातील दुर्गंधीमुळे प्रवाशांचा जीव मेटाकुटीस येतो. ऐरोली रेल्वेस्थानकात ठाणे-बेलापूर मार्गाच्या दिशेने असणाऱ्या तिकीट खिडक्या बंदावस्थेत आहेत. यामुळे प्रवाशांना पश्चिमेकडे येऊन तिकीट काढावे लागते. स्थानकाच्या पूर्वेस सिडकोकडून भाडेतत्त्वावर देण्यासाठी गाळे बांधण्यात आले आहेत; मात्र हे गाळे कधी सुरूच झालेले नाही. रेल्वेस्थानकाच्या शौचालयांची दुरवस्था झाली असून दुर्गंधीमुळे प्रवाशांना नाक मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

फलाटावरील आसनव्यवस्था कमी असल्यामुळे प्रवाशांना रेल्वेची वाट पाहत ताटकळत उभे राहावे लागते. रात्रीच्या वेळी स्थानक परिसरातील दिवे बंद असल्याने प्रवाशांना विशेषतः महिलांना असुरक्षित वाटते.

# मोखाडा ग्रामीण रुग्णालयातील महाडायलिसिस केंद्र रुग्णांसाठी वरदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मोखाडा, ता. ९ :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागअंतर्गत पालघर जिल्हा शल्यचिकित्सक आणि एच.एल.एल. लाइफ केअर यांच्या संयुक्त विद्यमाने मोखाडा ग्रामीण रुग्णालयामध्ये सुरू झालेल्या महाडायलिसिस केंद्राला तीन महिने पूर्ण झाले आहेत. जव्हार आणि मोखाडा तालुक्यांतील सहा रुग्णांवर विनामूल्य उपचार करण्यात आले आहेत. नुकतेच येथे १००वे डायलिसिस यशस्वीपणे पार पडले आहे. येथील रुग्णांना काही महिन्यांपूर्वी नाशिक, सिल्व्हासा येथे उपचारासाठी जावे लागत होते. त्यामुळे मोखाड्यातील हे केंद्र रुग्णांना वरदान ठरले आहे.

दोन महिन्यांपूर्वी जव्हारचे डायलिसिस सेंटर बंद झाल्यामुळे तिथल्या रुग्णांची झालेली अडचण मोखाड्यातील महाडायलिसिस केंद्रामुळे सुटली आहे. या केंद्रामध्ये राम लाड हे वरिष्ठ तंत्रज्ञ व राजेंद्र शिंगाडे हे कनिष्ठ तंत्रज्ञ कार्यरत आहेत. त्यांना अधिपरिचारक रोहित गोलवड व परिचर दीपक बरफ हे साह्य करत आहेत. किडनी विकारतज्ज्ञ डॉ. अनुराग शुक्ला यांच्या ऑनलाइन सल्ल्यानुसार व ग्रामीण रुग्णालयातील तत्काळ विभागातल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली प्रत्येक डायलिसिस पार पडते. प्रयोग शाळेतील चाचण्यासाठी जव्हारमधील हिंद लॅब आणि रक्तासाठी जव्हार कुटीर रुग्णालयातील रक्तपेढीचे साह्य घेतले जात आहे. एकीकडे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता आणि सुविधांचा अभाव असताना, अतिदुर्गम भागात किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी उपलब्ध असलेली जीवनावश्यक आरोग्य सुविधा वरदान ठरली आहे.

जिल्हा शल्य चिकित्सकांकडून
# नवनियुक्त अधिकाऱ्यांना अन्न भेसळ शोध मोहिमेचे धडे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे , ता. ९ :** कर्तव्यावर असताना एखाद्या ठिकाणी टाकलेल्या धाडीत शिळे अन्न कसे ओळखायचे, ते तपासणीसाठी घेताना कशी, कोणती काळजी घ्यावी, याबाबतचे धडे डॉक्टरांनी नवनियुक्त अधिकाऱ्यांना दिले. या प्रशिक्षणासाठी २५ अधिकारी सहभागी झाले होते. या प्रशिक्षण सत्रात अन्न भेसळीमुळे होणाऱ्या गंभीर आजारांचीही माहिती देण्यात आली.

बाजारातील भेसळयुक्त, निकृष्ट शिळे, विषारी अन्न आणि त्यांच्या पुरवठ्यावर लक्ष ठेवून संबंधितांवर कठोर कारवाईची जबाबदारी आहे. त्यासाठी अन्न ओळखणे, त्याचा पुरावा म्हणून वापर करण्याकरिता घटकांच्या माहितीचे टिपण करणे, या कामांमध्ये अधिकाऱ्यांना मदत मिळावी म्हणून आहारतज्ज्ञ आणि वैद्यकीय डॉक्टरांनी मंगळवार (ता. ८) अन्न व औषध विभागातील अधिकाऱ्यांना कार्यपद्धती, जबाबदाऱ्या, अन्न सुरक्षेचे धोरण, धूम्रपान प्रतिबंध, तसेच विषबाधा यांसारख्या आरोग्यविषयक संकटांमध्ये आवश्यक उपाययोजनांबाबत सखोल मार्गदर्शन केले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर घेण्यात आले.

> **अन्न सुरक्षा यंत्रणेची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. नवनियुक्त अधिकाऱ्यांसाठी हा अनुभव मार्गदर्शक, प्रेरणादायी ठरला.**
> **- डॉ. कैलास पवार, जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे**
> ❄❄❄❄
> **महाप्रसाद किंवा लग्नासारख्या ठिकाणी, रुग्णालयांमध्ये रुग्णांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या तपासणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांना दिलेले प्रशिक्षण त्यांच्या कामाकरिता महत्त्वाचे ठरणार आहे.**
> **- गजानन पाटील, प्रकल्प अधिकारी, ग्राहक संरक्षण विभाग**

# मीरा भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची उचलबांगडी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**मुंबई :** मीरा-भाईंदर आणि वसई-विरार पोलीस आयुक्तालयात मोठा बदल करण्यात आला आहे. सध्याचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची बदली झाली असून त्यांची नियुक्ती अप्पर पोलीस महासंचालक पदावर करण्यात आली आहे. त्यांच्या जागी आता वरिष्ठ पोलीस अधिकारी निकेत कौशिक हे मीरा भाईंदर वसई विरार शहराचे नवीन पोलीस आयुक्त म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

मधुकर पांडे यांनी मीरा-भाईंदर व वसई विरार पोलीस आयुक्त पदावर कार्यरत असताना गुन्हेगारीला आळा घालण्याबरोबरच पोलीस प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या कार्यकाळात अनेक मोठ्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले होते. आता त्यांच्या जागी निकेत कौशिक हे पोलीस आयुक्त म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. निकेत कौशिक हे याआधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत होते.



# कोट्यवधी खर्चून बांधलेल्या रस्त्याला दुभाजकच नाही ?
## अपघातांच्या भीतीने बदलापुरातील रस्त्याची सर्वत्र चर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**बदलापूर, ता. ९ :** अंबरनाथ-बदलापूर मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटचे काम दोन वर्षांपूर्वी हाती घेण्यात आले. कोट्यवधींचा खर्च करून हा रस्ता नव्याने बांधण्यात आला. त्यात संबंधित ठेकेदाराला या कामाचे संपूर्ण पैसे अदा करण्यात आले. मात्र, या मुख्य रस्त्याच्या दुभाजकाचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. दुभाजकासाठी तयार केलेले खड्डे आहे त्या अवस्थेत आहे. अनेकदा या ठिकाणी मोठ्या वाहनांचे चाक अडकत असल्याने हा मुख्य रस्ता अपघाताला आमंत्रण देणारा ठरत आहे.

मुंबई ते बदलापूर असा वाहतुकीसाठी असलेला महामार्ग धोकादायक स्थितीत आहे. दोन वर्षांपूर्वी डांबरीकरणाचे सगळेच रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्याचे ठरल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याचे काम हाती घेतले. राज्य सरकारच्या कोट्यवधींच्या निधीतून हा रस्ता बांधण्यात आला. महामार्गाचे काम पूर्ण झाले; मात्र संबंधित ठेकेदाराने मुख्य महामार्गावर दुभाजक बांधलेच नाहीत. या महामार्गावर ५० ते १०० मीटर असा भाग सोडून, थोड्या थोड्या पट्ट्यात दुभाजक बांधले आहेत. उर्वरित भागात केलेला खड्डा त्याच स्थितीत असल्याने या ठिकाणी अंदाज न आल्याने चारचाकी वाहनांची चाके खड्ड्यात अडकत आहेत. यामुळे काही वाहनांचे किरकोळ नुकसानही झाले आहेत. त्यातच या रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढली आहे. भविष्यात या ठिकाणी एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असताना रस्ता बांधकामासाठी निविदा काढून कोट्यवधींचा खर्च करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाला दुभाजकाचे काम पूर्ण झाले की नाही, याबाबत कल्पनाच नव्हती. वाहनचालकांनी तक्रारी दिल्यानंतर, तसेच बातमी संदर्भात प्रतिक्रिया विचारताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दुभाजक नसल्याची माहिती मिळाली.

> **"रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहे. ठेकेदाराला संपूर्ण पैसे अदा करण्यात आले आहेत; मात्र दुभाजकाचे काम का पूर्ण करण्यात आले नाही? याबाबत संबंधित ठेकेदाराकडून माहिती घेऊन तावडतोब उर्वरित काम करण्यास त्याला सूचना देऊ. लवकरच हे काम पूर्ण करून घेण्यात येईल.**
> **- प्रशांत कुमार मानकर, अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग**

# काळूनदीत बुडणाऱ्या तिघांना ग्रामस्थांकडून जीवनदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** टिटवाळ्या जवळील काळू नदी परिसरात फिरण्यासाठी आलेले तीन जण मंगळवारी पोहण्याचा आनंद घेण्यासाठी काळू नदीत उतरले. खोल पाण्याचा आणि पाण्याच्या वाढत्या वेगवान प्रवाहाचा अंदाज न आल्याने हे तिघे जण वाहून गेले. ते काळू नदीवरील टिटवाळा भागातील एका लहान पुलाखाली अडकले. ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नातून या तिन्ही तरूणांना वाचविण्यात यश आले. हे तिन्ही तरूण तगडे असल्याने पुलाच्या भिंतीमधून बाहेर आलेल्या एका झाडाची लहान फांदी, या भागात लटकत असलेल्या दोरीला धरून होते. मुसळधार पाऊस सुरू असल्याने नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढत होता. या तरूणांना पोहता येत असले तरी त्यांना वेगवान पाण्याचा अंदाज न आल्याने ते वाहून आले होते. ते बचावासाठी धावा करत होते. काळू नदीवरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना पुलाखाली पाण्यात तरूण अडकल्याचे ग्रामस्थांना समजले. ही माहिती त्यांनी टिटवाळा भागातील ग्रामस्थांना दिली. या भागात भातशेतीची कामे सुरू आहेत. शेतावरील शेतकरी तरूण अडकलेल्या भागात जमा झाले. काही गुराखी तेथे आले.

पण त्यांच्याकडे तरूणांना बचावासाठी काही नव्हते. हे तिन्ही तरूण एकमेकांना आधार देत पुलाखालील पाण्यात तरंगत होते. ही माहिती गुरवली पाडा येथील मच्छिमार मिलिंद एकनाथ दळवी, सुनील जाधव आणि पाड्यातील ग्रामस्थांना समजली. त्यांनी तात्काळ दोरखंड आणि तरूणांना बाहेर काढण्याचे आवश्यक सामग्री घेत काळू नदीच्या लहान पुलाकडे धाव घेतली. आणि तिघांचे प्राण वाचले

# भिवंडीत परप्रांतीय रिक्षाचालकाची मराठी तरुणाला मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** राज्यात सध्या मराठी-परप्रांतीय वादाने राजकारण तापले असताना भिवंडीत एका परप्रांतीय रिक्षाचालकाने मराठी तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) स्थानिक नेत्यांनी हस्तक्षेप करत रिक्षाचालकाला माफी मागायला भाग पाडले. या घटनेने पुन्हा एकदा मराठी-परप्रांतीय तणाव चर्चेत आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी बायपास येथे एक मराठी तरुण प्रवासी रिक्षात बसला होता. त्यावेळी किरकोळ कारणावरून त्याचा परप्रांतीय रिक्षाचालकाशी वाद झाला. हा वाद इतका वाढला की, रिक्षाचालकाने तरुणाला मारहाण केली. यानंतर पीडित तरुणाने मनसेच्या स्थानिक नेत्यांना याची माहिती दिली. मनसेचे भिवंडी शहराध्यक्ष मनोज गुळवी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत रिक्षाचालकाला चांगलाच दम दिला. त्यांनी रिक्षाचालकाला मराठी तरुणाची माफी मागायला लावली.

मनोज गुळवी यांनी यासंदर्भात बोलताना कडक इशारा देत म्हटले, "यापुढे कोणीही मराठी तरुणाला हात लावण्याचा प्रयत्न केला, तर त्याचा हात कुठे लटकेल हे आम्ही दाखवून देऊ." या घटनेनंतर रिक्षाचालकाने सार्वजनिकरित्या माफी मागत दिलगिरी व्यक्त केली आहे. या प्रकरणाने भिवंडीत तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांमध्येही यावरून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी मनसेच्या तात्काळ हस्तक्षेपाचे स्वागत केले, तर काहींनी या घटनेमुळे मराठी-परप्रांतीय वाद आणखी चिघळण्याची भीती व्यक्त केली आहे.



# केडीएमसी आयुक्तांचे संवेदनशील रूप
## वृद्धाला हात धरून खेचणाऱ्या अधिकाऱ्यावर आयुक्तांचा संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडे रस्त्यांवरील खड्डयांसंदर्भात कैफियत मांडण्यासाठी सरसावलेल्या एका डोंबिवलीकर वृद्धाला केडीएमसीच्या ताफ्यातील काहींनी बखोटे पकडून मागे ओढले.

हा प्रकार पाहून आयुक्त भडकले. त्यांनी वृद्धाची कैफियत ऐकून घेतली. तुमच्यासाठीच तर आलोय, असे सांगणाऱ्या आयुक्तांनी स्टेशन परिसरातील विदारक दृश्य पाहून उपस्थित अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. मंगळवारी आयुक्त अभिनव गोयल यांनी डोंबिवलीत जनता दरबाराचे आयोजन केले होते. त्यानंतर त्यांनी शहरात पाहणी दौरा केला होता. या दौऱ्यादरम्यान हा सारा प्रकार घडला.

स्टेशन परिसरातील पाहणी दौऱ्यादरम्यान ज्येष्ठ डोंबिवलीकर रस्त्यांतील खड्डयांची समस्या मांडण्यासाठी पुढे आले. त्यावेळी आयुक्तांच्या सोबत असलेले वरिष्ठ अधिकारी काहीसे चिडले. त्यानंतर त्यांच्यासोबत असलेल्यांनी या ज्येष्ठाला बखोटे पकडून मागे खेचण्याचा प्रयत्न केला.

हे पाहून आयुक्त अभिनव गोयल यांनी या वृद्धाशी आपुलकीने संवाद साधत त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतले. एकीकडे महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आडमुठेपणा, तर दुसरीकडे आपुलकीने बोलणारे आयुक्त हा प्रशासनकर्त्यांतील फरक या निमित्ताने दिसून आला.

# भाज्यांची दरवाढ
## वाढत्या महागाईचा वसईकरांना फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** गेल्या काही काळात पडलेल्या मुसळधार पावसामुळे वसईच्या बाजारात होणारी भाज्यांची आवक घटली आहे. परिणामी, ३० ते ४० रुपयांनी भाज्यांचे दर वाढले आहेत. वाढती महागाई आणि त्यात वाढलेल्या भाजीच्या दरामुळे सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लागली आहे. वसईत होळी, अंबाडी, पापडी आणि निर्मळ अशा विविध ठिकाणी भाजी बाजार भरतो. यापैकी होळी आणि अंबाडीच्या बाजारात नाशिक बाजार समीतीतून भाज्यांची आवक होते. तर निर्मळ आणि पापडीमध्ये नाशिक बाजार पेठ तसेच स्थानिक विक्रेत्यांकडून पिकवला जाणारा भाजीपाला देखील उपलब्ध असतो. या बाजारातून दररोज बरेच नागरिक भाजी खरेदी करतात पण, जून-जुलै महिन्यात ३० ते ४० रुपयांनी वाढलेल्या भाजीच्या दरांमुळे नागरिकांच्या तोंडचं पाणी पळालं आहे.




# मासिक पाळीचा संशय : विद्यार्थीनींची गणवेश काढून तपासणी !
## शहापूरातील शाळेत धक्कादायक लाजिरवाणा प्रकार ✻ प्राचार्यासह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर येथील एका नामांकित शाळेमधील स्वच्छतागृहात रक्त सांडल्याचे दिसल्याने मासिक पाळी कोणत्या विद्यार्थीनीला आली आहे हे तपासण्यासाठी सहावी ते दहावीच्या सव्वाशे विद्यार्थिनींचे गणवेश काढण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विद्यार्थीनींनी हा प्रकार घरी येऊन अक्षरशः रडत पालकांसमोर कथन केला. त्यानंतर हा प्रकार उघड झाला. या घटनेनंतर संतापलेल्या पालकांनी शाळा आणि पोलीस ठाण्यासमोर ठिय्या मांडला. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात प्राचार्यांसह आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी प्राचार्य आणि एका कर्मचारीला अटक केली आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांनी शाळेत जाण्यासही घाबरत असल्याचा आरोप पालकांनी केला.

शहापूर येथे नर्सरी ते दहावी पर्यंतची शाळा असून या शाळेत सुमारे ६०० विद्यार्थी शिक्षण घेतात. मंगळवारी शाळेच्या स्वच्छतागृहात रक्ताचे डाग सांडल्याचे दिसल्याने ते नेमके कुठल्या विद्यार्थिनींचे आहेत. याबाबत शाळेच्या प्राचार्यांनी विचारणा केली. या गंभीर प्रकाराने धास्तावलेल्या मुली एकदम स्तब्ध झाल्याने प्राचार्यांनी शाळेमधील महिला कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सहावी ते दहावीच्या सुमारे सव्वाशे विद्यार्थिनींचे गणवेश काढून त्यांची तपासणी केली. विशेष म्हणजे शाळेमध्ये पाण्याचा अभाव असल्याने मुलींनी भिंतीला पुसलेल्या रक्ताचे डाग प्रोजेक्टर मधून सर्व विद्यार्थ्यांना दाखवले. विद्यार्थिनींच्या बोटाचे ठसे ही घेतले असल्याचा आरोप पालकांनी केला. या गंभीर प्रकारामुळे मुलींनी घरी येऊन अक्षरशः रडत रडत पालकांकडे झाला प्रकार कथन केला. यामुळे संतप्त झालेल्या पालकांनी एकत्र येऊन बुधवारी सकाळी शाळा गाठून प्राचार्यांना घेराव घालत जाब विचारला. पालकांचा संताप पाहून प्राचार्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यामुळे शाळा परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. शहापूरचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे, पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी पालकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, गटशिक्षणाधिकारी रामचंद्र विशे यांसह पोलिसांनी संस्थाचालकांना मोबाईलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र संस्थाचालकांनी प्रतिसाद दिला नाही. अखेर पालकांनी आपला मोर्चा पोलीस ठाण्याकडे वळवला. तेथे शाळेविरोधात घोषणा करत ठिय्या मांडण्यात आला. दरम्यान, संस्थाचालकांसोबत घटनेबाबत बोलणे झाले असून प्राचार्यांना बडतर्फ करण्याबाबतचे पत्र पाठवत असल्याचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच प्राचार्यांविरोधात नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येत असून त्यांना अटक करण्यात येणार असल्याचे पालकांना आश्वासित केले.

## अकरावी प्रवेशापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही

**- शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण तसेच शहरी विद्यार्थ्यांना विविध शाखेमध्ये तसेच विविध भागात जास्तीत जास्त संधी मिळावी, यासाठी अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा अवलंब केला आहे. राज्यात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यात कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिली. ग्रामीण भागात लागू करण्यात आलेली अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन करावी, यासंदर्भात विधान परिषद सदस्य जयंत आसगावकर यांनी लक्षवेधी सुचनेद्वारे प्रश्न विचारला होता. या लक्षवेधी दरम्यान सदस्य राजेश राठोड, डॉ. परिणय फुके, एकनाथ खडसे यांनीही सहभाग नोंदविला. राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, महानगर भागात राबविण्यात येत असलेली ऑनलाईन प्रक्रिया योग्य पद्धतीने राबविली जात आहे. आता ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत मागे राहू नये, हा उद्देश आहे. यामुळे खेड्यातील विद्यार्थ्याला शहरी भागात प्रवेश घेता येऊ शकेल. या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत अनेक फायदे असल्याचेही डॉ.भोयर यांनी सांगितले. राज्यातील शाळेत २१ लाख विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. मात्र प्रत्यक्षात ११ लाख विद्यार्थी प्रवेश घेत असल्याचे दिसते. त्यामुळे पारदर्शकतेसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया आवश्यक असल्याचे डॉ.भोयर यांनी सांगितले. राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, पूर्वी अकरावीमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना प्रत्येक कॉलेजची 500 रुपयांपर्यंत माहितीपुस्तिका विकत घ्यावी लागायची. आता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात असल्याने अतिशय कमी किमतीत प्रवेश मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# गुरुवर्य अलोकनाथ महाराज

श्री दत्तभक्त नवनाथ पंथी प.पू. रमणनाथ महाराज यांची संजिवन समाधी सन १७३५ ची आहे. प.पू. रमणनाथ महाराज ई.स. १६०० शतकात या ठिकाणी श्री शैलम येथून आले.

प्रभू दत्तगुरूंच्या दर्शन प्राप्तीसाठी या स्थानावर ११० वर्षे तपसाधना केली. प्रभू दत्त भगवान यांनी त्यांना प्रत्यक्ष दर्शन देवून अनुग्रह दिला. विश्वकल्याणार्थ भूतलावर श्रीदत्त प्रभूनी २४ अनुयायी तयार केले. त्यात श्री. रमणनाथ महाराज १७ वे अनुयायी होते. जनहितार्य मार्गदर्शन करणे, दुःखी जनांचे दुःख दूर करून आनंदमय जीवन प्राप्त करून देणे. दत्तसंप्रदयाची अध्यात्मिक माहिती देवून प्रचार व प्रसार करणे असे विधायक कार्य श्री दत्तप्रभुंच्या आदेशाने प.पू. रमणनाथ महाराजांनी केले. पुढे भगवान दत्तात्रेय यांच्याच आदेशाने त्रिपुरारी पौर्णिमेस सन १७३५ मध्ये येथे संजीवन समाधी घेतली. अशा महात्म्यांनी समाधी घेतल्यानंतरही त्यांचे अस्तित्व कायम ठेवलेले असते. भक्तांना त्यांच्या श्रध्दाभक्तीनुसार दर्शन लाभ मिळतो. भक्तजनांचे पाठीशी त्यांचे आशिर्वाद कायम असतात.

प्रभू भगवान दत्तात्रेयाचे या स्थानाचे प्रथम प्रचारक तथा सेवक प.पू. रमणनाय महाराजच होते असे स्पष्ट दिसून येते.

समाधीनंतर बराच कालावधी गेला. सभोवताली विशाल वृक्षांनी जागा व्यापली. काही काळ हे स्थान दुर्लक्षित झाले. जवळच काही वर्षांनी तानसा धरणाचे काम सुरू झाले होते. धरणासाठी रेती पुरवठा करणेचे काम त्यावेळी भागवत नावाचे व्यक्तीकडे होते. ते दुपारी किंवा अन्य वेळी विश्रांतीसाठी मोठ्या झाडांच्या सावलीचा आश्रय घेत असत. जागा साफ करून विश्रांती घेत असत. असेच एक दिवस समाधीजवळ आले. बांधलेला ओटा समजून तेथे विश्रांती केली तेथेच समाधीतून त्यांना दृष्टान्त दिला. अरे मी येथे रमणनाथ महाराज आहे. सभावतालची जागा साफ कर, दिवाबत्ती सुरू कर आणि भागवतबाबांना दृष्टान्त व अनुग्रह झाला. पुढे त्यांनी विकास सुरू केला. भक्तगण येथे वाढत गेले.

प.पू. भागवत बाबांनी येथे सेवा कार्य सुरू केले. परिसरात प.पू. रमणनाथः महाराजांच्या समाधीची माहिती लोकांना समजली. मोठ्या प्रमाणात भक्तगण दर्शनासाठी येवू लागले. दर्शनाने



आत्मसुख मिळते, दुःख दूर होते असे अनुभव भक्तांना येवू लागले. भक्त संख्या वाढू लागली. ही माहिती तालुक्यातून जिल्हयांत पसरली. शेजारच्या अनेक जिल्हयांत माहिती गेल्याने अनेक भक्त दर्शनासाठी येवू लागले. नाशिक, पूणे जिल्हयातून भक्तगण मोठ्या प्रमाणात येथे दर्शनासाठी वाढत चालले. नाशिकहून भक्तमंडळासोबत श्री दुर्गानाथ बाबा आले होते. समाधी दर्शनाने ते प्रभावित झाले व उर्वरित आयुष्य अशाच ठिकाणी व्यतीत करावे, सेवाकार्यास समर्पित व्हावे असा मनोनिग्रह करून ते येथेच थांबले.

प.पू. भागवत बाबांचे पुढील कार्य त्यांनी प्रारंभ केले. प.पू. भागवत बाबा या स्थानाचे मठाधिपती होते. प.पू. दुर्गानाथ महाराजांना प.पू. रमणनाथ महाराज यांचे आदेश, दृष्टान्त प्राप्त होत होते. ते उत्तम साधक व सन्याशी असल्याने भक्तगणांना त्यांच्या मार्गदर्शनाचे व आशिर्वादाचे लाभ व अनुभव मिळत होते.

प.पू. दुर्गानाथ महाराज अनेक वेळा गाणगापूर व अन्य तीर्थक्षेत्रात जावून त्यांची तपसाधना करीत असत. त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग ते जनहितार्थ करीत असत. ज्ञानेश्वरीत म्हटल्याप्रमाणे "जे जे आपणाशी ठावे ते ते दुसऱ्याशी द्यावे। शहाणे करून सोडावे सकल जन।।" या प्रमाणे त्यांचे सेवा कार्य "तमसो मां ज्योतिर्गमयम्" भक्तांसाठी अखंड चालू होते. भक्तसंख्या वाढत गेल्याने त्यांची निवास अन्य व्यवस्था करणे आवश्यक होते. शिवाय समाधीस्थानाभोवती विस्तार, दत्तमंदिर उभारणे अशी अनेक कामे त्यांनी भक्तांच्या सहकार्याने सुरू करून पूर्ण केली. गरीब विद्यार्थ्यांना मोफत राहणे, जेवण व शिक्षण व्यवस्था केली. अनेक विद्यार्थी पदवीधर झाले असून पुढील शिक्षण घेत आहेत. "परोपकाराम इदं शरीरम्" या प्रमाणे अखंड आयुष्य त्यांनी जनसेवेसाठीच व्यतीत केले.

प.पू. रमणनाथ महाराज समाधी स्थळावर भक्तगण मोठ्या संख्येने वाढत चालले. त्या प्रमाणात व्यवस्थाही करणेत आली. वार्षिक कार्यक्रम ठरविणेत आले. त्यात विशेष म्हणने त्रिपुरारी पौर्णिमा प.पू. रमणनाथ महाराजांचा समाधी दिन असल्याने ३ दिवसीय जनकल्याणार्थ यज्ञ कार्यक्रम प्रारंभ केला. गुरूपौर्णिमा, दत्तजयंती उत्सव सुरू झाले. हे सर्व कार्य प.पू. दुर्गानाथ महाराजांचे मार्गदर्शनाने भक्त समुदायाचे मदतीने मोठ्या प्रमाणात सुरू झाले.

या अखंड कार्यासाठी "रमणनाथ महाराज बहुउद्देशिय संस्था" शासनमान्य करणेत आली. आज या ठिकाणी भव्य दत्तमंदिर आहे. प.पू. रमणनाथ महाराज समाधी स्थान आकर्षक सुंदर बनविले आहे. भक्त निवास, भोजनगृह, विविध छोटी मंदिरे, उत्तम पाणी व्यवस्था, आवश्यक सर्व व्यवस्था तयार करण्यात आल्या आहेत. प्रभू दत्तात्रेयांची आवडती गोमाता म्हणून येथे गोसेवा म्हणून गोशाळा सुरू केली आहे. गरीब विद्यार्थ्यांना मोफत राहणे, जेवण/शिक्षण उपक्रम चालू आहे. अत्यंत सेवाभावी कार्य संस्थेमार्फत सुरू आहे.




# श्री आप्पासाहेब धर्माधिकारी - अध्यात्मविद्या आणि प्रबोधन

भाषण आणि निरूपण ह्या दोन शब्दांमध्ये खूप मोठा फरक आहे. भाषण ऐकून बदल घडेल हे सांगू शकत नाही परंतु निरूपण श्रवण केल्याने माणसाच्या अंतरंगात अमुलाग्र बदल होतो हे निश्चित आहे. त्यातून जर श्री आप्पासाहेब ह्यांच्या मौखिक निरुपणाचा प्रसाद मिळाला तर दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. ज्यांना ज्यांना आपल्या आयुष्यात श्री आप्पासाहेब ह्यांचे मार्गदर्शन लाभले त्यांना जगण्याची योग्य दिशा मिळाली आहे हे सत्य नाकारता येऊ शकत नाही. आजपर्यंत श्री आप्पासाहेब धर्माधिकारी ह्यांना आपण स्वच्छतादूत म्हणून ओळखत होतो. आज त्यांच्या वाढदिवशी त्यांच्या आणखी काही व्यक्तिमत्त्व पैलूची ओळख घेतली पाहिजे.

"श्री समर्थ अध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती रेवदंडा अलिबाग" येथून श्री आप्पासाहेब जगभर पसरलेला हा सगळा कार्यभाग सांभाळत असतात. तळागाळातील प्रत्येक मनुष्यासाठी, समाजाच्या सेवेसाठी श्री आप्पासाहेबांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले आहे. त्यांचे अमूल्य विचार ऐकून आत्मसात करणाऱ्या श्री सदस्यांवर आलेल्या प्रसंगांमध्ये त्यांना स्थिती देऊन उभे करणे, तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे श्री आप्पासाहेब ह्याचे मूळ कार्य. या कार्याची सुरुवात त्यांचे वडील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी ह्यांनी १९४३ सालापासून केली. ग्रंथराज श्रीमत दासबोध घराघरात जर कोणी पोहोचवला असेल तर ते आपले नानासाहेब !!!. श्रीमत दासबोध ह्या ग्रंथाचा आधार घेऊन आपल्या प्रासादिक वाणीने, मौखिक निरुपणाच्या साहाय्याने श्री नानासाहेबांनी प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळवले. आज तेच कार्य, तेवढ्याच जोमाने,



तत्परतेने जगभर पोहोचविण्याचे कार्य श्री आप्पासाहेब करत आहेत.

आज फक्त महाराष्ट्र नव्हे, आजूबाजूची राज्य नव्हे, फक्त भारत देश नव्हे तर अनेक देशांमध्ये ह्या मौखिक निरुपणाच्या साहाय्याने, वेगवेगळया भाषांमध्ये श्री समर्थ बैठका चालू आहेत. ठरलेल्या वेळेत, ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी त्यांचे लाखोंच्या संख्येने असलेले सदस्य हे निरूपण ऐकण्यासाठी आवर्जून जात असतात. २५ नोव्हेंबर २००८ ह्या दिवशी खारघर नवी मुंबई येथे महाराष्ट्र भूषण सोहळयासाठी तब्बल ३५ लाख श्री सदस्य जमले होते अशी लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. एखाद्या इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीला लाजवेल असे हे कार्य श्री आप्पासाहेब रेवदंडा येथे बसून कसे काय करतात हे प्रत्येकासाठी आजपर्यंत न उलगडलेले कोडे आहे. दिवसेंदिवस ही सदस्य संख्या वाढत जात असताना दिसत आहे. आता महाराष्ट्रात जर सत्कार समारंभ घ्यायचा असेल आणि तिथे सर्व श्री सदस्यांना एकत्र करायचं असेल तर अशी एखादी जागा कुठे शिल्लक असेल का? असा विचार येतो. लहान मुले, स्त्रिया, पुरुष, वयोवृद्ध अशा सर्व वयोगटातील सदस्यांना ह्या श्री बैठकीमधून मार्गदर्शन मिळत असते.

अनेक प्रकारच्या व्यसनामध्ये अडकलेले लोक श्रीबैठकीतील उत्तम विचारांमुळे हळू हळू ह्या व्यसनांपासून दूर जातात, अशी कित्येक उदाहरणे ह्या श्री बैठकीत पाहायला मिळतात. अशी कोणती ताकद ह्या मौखिक निरुपणामध्ये असावी ह्याचा कोणीही अंदाज लावू शकत नाही. ठरलेल्या दिवशी एक एक करून काही मिनिटांमध्ये १०००-२००० सदस्य एकत्र येऊन हॉल भरून जातात. निरूपण चालू असताना तिथे एवढी शांतता असते की, आतमध्ये कितीजण बसले आहेत ह्याचा अंदाज बाहेरून लावायचा असेल तर रांगेत लावलेल्या चपलांवरून लागू शकतो. एवढी शिस्त, एवढी शांत बसण्याची ताकत ह्या सदस्यांमध्ये कुठून येत असेल असा प्रश्न नेहमी पडतो. म्हणजेच श्री आप्पासाहेब आपल्या अध्यात्मासोबत आचरणाबद्दल सुद्धा मौखिक निरूपण देत असतात. खरोखर जो ही शिकवण अंतःकरणात घेतो त्याचे पुढील दिवस सुगीचे असतात ह्यात शंका नाही.

सतत मोबाईलमध्ये व्यस्त असलेली आताची तरुण पिढी आणि अध्यात्म निरूपण ह्याचा दूर दूर पर्यंत संबंध नसतो. पण श्रीआप्पासाहेबांच्या बैठकीमध्ये हे चित्र एकदम उलट दिसून येते. जास्तीत जास्त तरुण मुले ह्यामध्ये समाविष्ट झालेली दिसून येतात, ह्या निरुपणाची अवीट गोडी त्यांच्यामध्ये निर्माण झालेली दिसत आहे. परमार्थ हा विषय तसा खूप गहन आहे. तो समजावून घेण्यासाठी श्री आप्पासाहेबांची साथ कायम असणे गरजेचे आहे. अध्यात्माची, ईश्वराची योग्य ती ओळख होण्यासाठी साथ लागते ती योग्य व्यक्तिमत्त्वाची... आणि लाखो श्री सदस्यांच्या आयुष्यातील ते श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आहेत.

श्रीमत दासबोध हा असा ग्रंथ आहे की, त्यामध्ये एकही चित्र नाही, वरवर वाचण्याचा प्रयत्न केला तर त्याचा खरा अर्थ कळत नाही. त्याचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल तर त्यावर अध्यात्मिक निरूपण मिळणे हे गरजेचे आहे. श्री आप्पासाहेब ह्यांचे अध्यात्मिक ज्ञान हे वाखाणण्याजोगे आहे. श्रीमत दासबोध ह्यामध्ये समर्थ रामदास स्वामी ह्यांनी वापरलेली भाषा ही सहज कळेल अशी असली तरी त्यामध्ये अध्यात्मिक अर्थ ओतप्रोत भरलेला आहे. नेमका तोच अर्थ आप्पासाहेब आपल्या निरुपणातून काढून देत असतात. संसारात गुरफटलेल्या माणसांना पिंड ब्रह्मांडाची निर्मिती, मूळमाया, त्रिगुण, षडगुणेश्वर, अष्टधा प्रकृती, शिवशक्ती, पंचमहाभूते अश्या शब्दांचा अर्थ कळणे खूप कठीण आहे. हे शब्द कोणत्याही अभ्यासक्रमात सहजासहजी येत नाहीत. परंतु ह्या दुर्मिळ आणि अतिमहत्त्वाच्या शब्दांची माहिती असणे खूप महत्त्वाचे आहे हे जाणून श्री आप्पासाहेब ह्यांनी मूळ ईश्वराची ओळख आपल्या निरुपणातून देण्याचा कायम प्रयत्न केलेला आहे.

अनेक श्री सदस्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या पद्मश्री डॉ. श्री. दत्तात्रेय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी ह्यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी प्रणाम व शिर साष्टांग दंडवत.. आपल्याला उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना..!!

**- अतिष म्हात्रे, आगरसुरे- अलिबाग**

# कांबा येथे वन विभागाची फसवणूक
# हिरव्यागार झाडांची अमानुष कत्तल

## आदिवासी आणि सरकारी जमीन बळकावण्याचा प्रयत्न
## पंचनामा अहवाल वन अधिकाऱ्यांना केला सादर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील कांबा गावातील भूमाफियांनी आदिवासी आणि सरकारी जमीन बळकावण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या जमिनीत लावलेली शेकडो हिरवीगार झाडांची कत्तल केल्याने स्थानिक सामाजिक संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. या प्रकरणी 'परहित चॅरिटेबल सोसायटी'चे अध्यक्ष विशाल गुप्ता यांनी कल्याणचे वन अधिकारी, तहसीलदार आणि ठाणे जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे हिरवीगार झाडे तोडल्याबद्दल तक्रार केली आहे.

हिरवीगार झाडे तोडणाऱ्या रामकिशोर खुबचंदानी आणि संजय शहा यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात, कल्याणचे वन अधिकारी शिंदे म्हणाले की, ज्या ठिकाणी झाडे तोडण्यात आली आहेत त्या ठिकाणी विभागीय भेट देण्यात आली आहे. परवानगीशिवाय झाडे तोडण्यात



आली आहेत. त्यामुळे त्या जागेचा पंचनामा करण्यात आला आहे आणि कल्याण सर्कलचे वरिष्ठ अधिकारी नीलेश आखाडे यांना अहवाल सादर करण्यात आला आहे. तसेच हिरवी झाडे तोडणारे रामकिशोर खुबचंदानी आणि संजय शहा यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

वन विभागाला हिरवी झाडे तोडणारे लोक कोण आहेत हे कळले आहे, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई का केली जात नाही असा प्रश्न विशाल गुप्ता यांनी केला असून, कल्याण तहसीलच्या रिकाम्या जमिनींवर भूमाफियांचे डोळे लागले आहेत. भूमाफिया त्यांच्या वर्चस्वाच्या बळावर कांबा गावा भोवती महसूल विभाग आणि गरीब आदिवासींच्या जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे प्रशासनाची परवानगी न घेता शेकडो हिरवी झाडे तोडण्यात आली असल्याचे गुप्ता यांनी सांगितले.

# ठाणे महापालिकेत लोकशाही दिनाचे आयोजन

## लोकशाही दिन ०४ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित निवेदन २१ जुलैं पूर्वी सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०४ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी ऑगस्ट महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २१ जुलैपूर्वी त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.


# व्यासपौर्णिमा

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा॥
गुरूरादिरनादिश्च गुरूः परम दैवतम्।
गुरोः परतंर नास्ति तस्मै श्री गुरवे नमः॥
सप्तसागरपर्यन्तं तीर्थस्नानादिकं फलम्।
गुरोरङिध्रपयोबिन्दुसहस्त्रांशेन दुर्लभम्।।
हरौ रूष्टे गुरस्त्राता गुरौ रूष्टे न कश्चन।
तस्मात् सर्व प्रयन्तेन श्रीगुरूं शरणं व्रजेत्॥
गुरूरेव जगत्सर्वं ब्रह्म विष्णुशिवात्मकम्।
गुरोः परतरं नास्ति तस्मात्संपूजयेद्गुरूम्॥

आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा म्हणून गौरवितो.

आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे. अशा या आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्याला मानतात, त्या ज्ञानदेवांनीसुध्दा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घेतू' असे म्हणून सुरुवात केली.

व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात



रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.

दत्तभक्तांसाठी हा पूण्यपावन दिवस! या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशिर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा इश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु-पारमार्थिक या दिवशी भक्तिभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

खरं गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन!

गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतो -

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः॥

आषाढ शुद्ध पौर्णिमा हा दिवस 'गुरुपौर्णिमा' म्हणून स्वीकारला आहे. त्यानिमित्त महर्षी व्यासांनी वेदाचे चार भाग, सहा शास्त्रे, अठरा पुराणांच्या रचना करून मानवी जीवनाला संपन्न केले आहे. या सर्वांतून भगवंताचे गुणगान, त्यांचे यशगान करीत मनुष्याला जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले आहे. या अमोलिक कार्याची कृतज्ञता म्हणून भारतीय पूर्वसुरींनी व्यासांचे पूजन या दिनी केल्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' अथवा "गुरुपौर्णिमा' असे म्हणतात. गुरु दोन प्रकारचे असतात एक गुरु! एक सदगुरु! अवधूतांनी यदुराजाला उपदेश करताना सांगितले की -

"जो जो जयाचा घेतला गुण।
तो म्यां गुरु केला जाण।
गुरुसी पडले अपारपण। जग संपूर्ण गुरु दिसे॥" असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले. या चोविसांचे महत्व तीन प्रकारांत आहे. एक सदगुण अंगीकारासाठी गुरू, दोन अवगुण त्यागासाठी गुरु आणि तीन ज्ञानप्राप्तीसाठी गुरु. म्हणजे 'गुरु' हे लौकिक दृष्टीने जे मार्गदर्शन करतात ते या विभागात येतील.

ज्यांनी आत्मनात्मविवेक सांगून मायेच्या संसाररूपी पुरातून मला वाचविले तो सदगुरु अखंड माझ्या हृदयात आहे, म्हणूनच माझे या विवेकावर प्रेम आहे. आदर आहे. ज्याप्रमाणे डोळ्यांत अंजन घातले असता दृष्टीचे तेज वाढते त्या दृष्टीने भूमिगत धन दिसू लागते. (दडलेले ज्ञान स्पष्ट दिसू लागणे.) ज्याप्रमाणे हाती चिंतामणी लागल्यास मनुष्याचे सदासर्वदा मनोरथ पूर्ण होतात.

'गुरुचरित्र' या ग्रंथात श्री गुरुंच्या लीलांचे वर्णन असले तरी गुरुंच्या ध्यानाचे, सेवेचे, भावाचे, पूजनाचे महत्व सांगितले आहे. कलीने ब्रह्मदेवांना 'गुरु' शब्दाचा अर्थ विचारला तेव्हा ब्रह्मदेवांनी सांगितला, की 'ग' कार म्हणजे सिध्द होय. 'र' कार म्हणजे पापाचे दहन करणारा. 'उ' कार म्हणजे विष्णूंचे अव्यक्त रूप. तसेच गुरु हाच ब्रह्मा, विष्णू, महेश. हे त्याचे त्रिगुणात्मक रूप आहे. या पलीकडे जे परब्रह्म तत्व आहे ते जाणण्यासाठी गुरुंचा आश्रय घ्यावा लागतो. ईश्वर जरी प्रसन्न झाला तरी त्याला ओळखणारा गुरुच असतो व गुरु स्वत: प्रसन्न झाला तर ईश्वर आपल्या अधीन होतो.

आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, कृष्ण, सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम, लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही. भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी वडीलबंधू निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले, तर संत नामदेव साक्षात विठ्ठलाशी भाष्य करीत असत. त्या नामदेवांचे गुरु होते विसोबा खेचर. भारतीय संस्कृतीत गुरूला नेहमीच पूजनीय मानले आहे. गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पौर्णिमा मानली जाते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरु शिष्याला ज्ञान देतात. तो ज्ञानाचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचावा, म्हणून गुरूची प्रार्थना करावयाची, तो हा दिवस होय.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024